MHAU060018342019

## नियमित दिवाणी दावा क्र. १८४/२०१९ मधील नि.क्र. १७ खालील आदेश

## वत्सल्याबाई विठ्ठल भाले वि. विठ्ठल बाला भाले

१. प्रतिवादी यांनी सदर अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला "लेखी कैफियत नाही" चा आदेश रद्द करणेकामी तसेच लेखी जबाब दाखल करण्यास झालेला ७६ दिवसांचा विलंब माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे की, सदर दाव्यात प्रतिवादी यांना समन्स तामील झाले परंतु प्रतिवादी हा आजारी असल्यामुळे व काही महत्वाचे कागदपत्रे व माहीती हस्तगत करण्यास विलंब झाल्यामुळे प्रतिवादी यांनी सदर दाव्यात लेखी जबाब मुदतीच्या आत देउ शकले नाही. त्यामुळे दिनांक २९.०९.२०२३ रोजी प्रतिवादी यांच्याविरुध्द निशाणी १ वर लेखी कैफियत नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. सदरचा आदेश रदद करुन प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला ७६ दिवसांचा विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात निशाणी १५ प्रमाणे दिनांक २३.१०.२०२३ रोजी सरतपासणीचे शपथपत्र दाखल करुन पुरावा दिलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक नाही तसेच कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर दावा प्रतिवादी विरुध्द वादी ही प्रतिवादी यांची लग्नाची पहिली पत्नी आहे असे घोषित होउन मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होउन ते विधीज्ञांमार्फत दिनांक १६.०१.२०२३ रोजी सदर दाव्यात हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांनी सदर दाव्यात तीस दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे आवश्यक असताना त्यांना पुरेशी संधी देउनही त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केल्याचे दिसुन येत नाही. सबब, प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक नाहीत. परंतु नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, सदर प्रतिवादी यांना त्यांच्या बचावाची संधी देणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला ७६ दिवसांचा विलंब माफ न केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. परंतु त्यांना झालेला विलंबापोटी त्यांच्यावर खर्च लादणे आवश्यक आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचा नि.क्र १७ चा अर्ज वादीस रक्कम रु. ५००/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

13/2/24

(अ. ई. आवटी)

दिनांक-१३.०२.२०२४

सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (कोर्ट न.२)

कन्नड